**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष १ ले | अंक २५३ वा | शनिवार ०३ फेब्रुवारी २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 253 | Date : 03/02/2024 blow :Saturday Page 4 Price 4

# साने गुरुजींच्या स्मारकास निधी उपलब्ध करून देणार : उपमुख्यमंत्री

जळगाव : महाराष्ट्रात अध्यात्म, ज्ञान, तत्वज्ञान रूजविणार अमळनेर हे महत्त्वाचे शहर आहे. राज्याचा सर्वांगिण विकासाबरोबर साहित्य, कला, संस्कृती व क्रीडा क्षेत्रातही शहरांचा विकास झाला पाहिजे. तरच ते शहर श्रीमंत शहर म्हणून ओळखले जाईल. साहित्य संमेलनाला आर्थिक बाबतीत कमतरता पडू नये, याची दक्षता शासनाकडून घेतली जाते. मराठी साहित्य संमेलनास गौरवाशाली परंपरा आहे. तीन वर्षांनी होणारे शंभरावे साहित्य संमेलन दिमाखात पार पडण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. प्रताप हायस्कूलमध्ये सानेगुरुजींचे सहा वर्ष वास्तव्य होते. साने गुरुजींच्या स्मारकाचा प्रस्ताव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तयार करावा. या प्रस्तावानुसार साने गुरुजींच्या स्मारकास येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. साने गुरुजींचे नावाप्रमाणेच भव्य स्मारक झाले पाहिजे. अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अमळनेर मराठी वाड्.मय मंडळाच्या वतीने आयोजित ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे येथील प्रताप महाविद्यालयाच्या मैदानावर आज उद्धाटन झाले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा.डॉ.रवींद्र शोभणे सपत्नीक उपस्थित होते. उद्धाटक म्हणून माजी लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांची उपस्थिती लाभली होती.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार मंगेश चव्हाण, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उद्योजक अशोक जैन, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, कार्यवाह उज्वला मेहेंदळे, समन्वयक नरेंद्र पाठक, साने गुरुजींच्या पुतणी सुधा साने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार पुढे म्हणाले की, अमळनेर मध्ये सुरू झालेल्या अनेक गोष्टी जगात पोहचल्या आहेत. विप्रो कंपनी, तत्वज्ञान केंद्राचा जागतिक पातळीवर नावलौकिक आहे. बहिणाबाईंनी अतिशय सोप्या भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. राज्यात वाचनसंस्कृती वाढावी. यासाठी आम्ही शासनपातळीवर प्रयत्नशील आहे. डिजिटल युगात वाचन संस्कृती बदलली आहे. वाचनसंस्कृती टिकून राहणे. ही समाजाची गरज आहे. मराठी साहित्य संमेलनास आता डिजिटल टच देण्यात आला आहे. सामाजिक सुधारणांच्या चळवळीत साहित्य, लेखक व कलाकारांचे अमूल्य योगदान आहे. राज्याच्या विकासासाठी साहित्यिकांनी व्यक्त झाले पाहिजेत. त्यांच्या सूचनांचा निश्र्चितच । पान २ वर



## निवासी डॉक्टर ७ फेब्रुवारीपासून संपावर

मुंबई : राज्यातील निवासी डॉक्टरांचे मूलभूत प्रश्न मानधनवाढ, वसतिगृहांची दुरवस्था, प्रलंबित भत्ते याविषयी २८वेळा पत्र पाठवूनही दाद न देणाऱ्या यंत्रणेविरोधात निवासी डॉक्टरांनी रोष व्यक्त केला असून राज्य शासनाच्या या उदासीन भूमिकेविरोधात ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा रुग्णसेवा ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपामध्ये राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालयांमधील निवासी डॉक्टर सहभागी होणार आहेत. निवासी डॉक्टरांची केंद्रीय संघटना 'मार्ड'ने यापूर्वीही वारंवार पाठपुरावा करुन मागण्यांची पूर्तता होत नसल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात केवळ तोंडी आश्वासनांवर या डॉक्टरांची समजूत घालण्यात आल्याचे दिसून आले आहे, दुसरीकडे हे मूलभूत प्रश्न अजूनही सुटले नाही. यापूर्वी, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्यासोबत ४ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीनंतर त्यांनी या समस्या सोडवण्याचे तोंडी आश्वासन दिले. मात्र, याची स्थिती 'जैसे `' आहे. निवासी डॉक्टरांच्या विविध मागण्यांसाठी जानेवारी २०२३ मध्ये संप केला होता. त्यावेळी सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन मिळाल्याने संप मागे घेण्यात आला होता. मात्र, वर्ष उलटले तरी सरकारकडून ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## अब की बार भाजप तडीपार...
## माणगाव येथील सभेत उध्दव ठाकरे एल्गार

मुंबई : ज्या पक्षाने नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदावर बसवले, त्याच पक्षाला आज भाजपवाले संपवायला निघाले आहेत. पंचवीस वर्षात भाजपचा पुर्ण अनुभव घेतला आहे. पाठ वळली की वार करायला कमी करणार नाही. त्यामुळे आता माघार नाही. अब की बार भाजपला तडीपार करावेच लागेल असे आवाहन उध्दव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. ते माणगाव येथे जनसंवाद मेळाव्यात बोलत होते. शिवडी न्हावा शेवा पुलाचा पहिला गर्डर माझ्या कार्यकाळात ठेवला गेला. त्याचे उद्धाटन करायला नरेंद्र मोदी आले. आता ज्या वरळी ते मरिन ड्राईव्ह कोस्टल रोडचे भूमिपुजन माझ्या कार्यकाळात झाले, त्या कोस्टल रोडचे उद्धाटन करण्यासाठी पंतप्रधान पुन्हा मुंबईला येत आहेत. आम्ही केलेल्या कामाचे श्रेय घ्या. पण




मुंबईत शिवस्मारकाचे जलपुजन मोदींच्या हस्ते झाले होते. ते कधी होणार, मुंबई गोवा महामार्गाचे काम कधी पुर्ण होणार असा सवाल ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला. कोकणात तौक्ते निसर्ग वादळे आली होती तेव्हा पंतप्रधान कुठे होते असा प्रश्र्नही त्यांनी विचारला. भारतीय सीमेवर चीन घुसखोरी करतो आहे. तो तुमचा दुष्मन आहे की आजवर तुम्हाला साथ देणारी शिवसेना, २०१४ साली भाजपने मोदींचे नाव पंतप्रधान पदासाठी जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांना पाठींबा। पान २ वर

## तेजस्वीला मुख्यमंत्री नको म्हणूनच राजदला सत्तेतून हटवल
### विनोद तावडेंचा सत्ताबदलाचा गौप्यस्फोट

मुंबई : लालूप्रसाद यादव यांनी जेडीयू फोडण्याचा प्रयत्न केला. तसं करून तेजस्वी यादव बिहारचे मुख्यमंत्री झाले असते. तर गुंडाराज आलं असतं. ते रोखण्यासाठीच नितीश कुमार यांनी भाजपसोबत पुन्हा जाण्याचा निर्णय घेतला असल्याचा गौप्यस्फोट भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी केला. विनोद तावडे यांनी 'माझा कट्टा'वर संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध राजकीय मुद्यांवर भाष्य केले. विनोद तावडे यांनी सांगितले की, इंडिया आघाडीमध्ये सगळं आलबेलं नव्हते.



काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना आघाडीचे अध्यक्ष नियुक्त केल्यानंतर नितीश कुमार नाराज झाले होते. त्यातच लालू प्रसाद यादव यांनी तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्याचे प्रयत्न सुरू होते. भाजपने त्यांच्यातील नाराजीचा फायदा आम्ही घेतला. जेडीयूमधील काही नेते संपर्कात होते. त्यांच्यासोबत संवाद होता. त्यातूनच आम्ही सत्ताबदल केला असल्याचे विनोद तावडे यांनी म्हटले.

चंदीगड महापौर निवडणुकीत कोणताही गैरप्रकार झाला । पान २ वर

## आमच्यात फार मतभेद, प्रकाश आंबेडकरांबरोबरच्या मविआच्या बैठकीनंतर संजय राऊतांची प्रतिक्रिया

मुंबई : वंचित बहुजन आघाडी गेल्या काही महिन्यांपासून शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या महाविकास आघाडीत सहभागी होण्यास उत्सूक आहे. वंचितच्या मविआमधील सहभागाबद्दल अद्याप कोणतीही गोष्ट निश्र्चित झालेली नाही. केवळ ठाकरे गट आणि शरद पवार गटाने त्यास हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर काँग्रेसवर नाराज होते. अशातच मुंबईत आज प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीनंतर शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत म्हणाले, आज चारही पक्षांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. लवकरच आम्ही आमची पुढची दिशा प्रसारमाध्यमांसमोर मांडू.



संजय राऊत म्हणाले, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आज मविआच्या बैठकीत सहभागी झाले होते. आमची सविस्तर चर्चा झाली आणि पुढील दिशा ठरली आहे. आमची अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. आम्ही सध्या आहोत त्या भूमिकेवर ठाम राहून, एकत्र राहून काम करायचं ठरवलं आहे. तसेच भाजपाला पराभूत करणं हीच भूमिका घेऊन निवडणुकीला सामोरं जायचं ठरवलं आहे. आपल्या देशात सध्या संविधानविरोधी वातावरण निर्माण केलं जात आहे. ते वातावरण शुद्ध करायचं आहे. त्याचबरोबर भाजपाला मदत होईल अशी पावलं उचलायची नाहीत, यावर एकमत झालं आहे.

ठाकरे गटाचे राज्यसभेतील खासदार म्हणाले, महाराष्ट्रातलं राजकारण ज्या पद्धतीने गटांगळ्या खातंय, त्याचबरोबर देशातलं हुकूमशाही आणि एकाधिकारशाहीचं । पान २ वर

## अंजली दमानिया सुप्रिया सुळेंच्या संपर्कात..,
### भुजबळांच्या भाजपाप्रवेशावर फडणवीसांचे उत्तर



मुंबई : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गुरुवारी रात्री केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टमुळे राजकीय वर्तुळात नवी चर्चा सुरू झाली. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ हे नाराज दिसत आहेत. २७ जानेवारी रोजी मराठा समाजासाठी काढलेल्या अध्यादेशावर छगन भुजबळ यांनी कडाडून टीका केली. तसेच सातत्याने ओबीसी समाजासाठी आवाज उचलणाऱ्या भुजबळांपासून राष्ट्रवादीनेही अंतर राखणे पसंत केले होते. अजित पवार गटाचे नेते प्रफुल पटेल यांनीही भुजबळ यांची भूमिका पक्षाची भूमिका नसल्याचे म्हटले होते. त्यानंतर आता अंजली दमानिया यांनी छगन भुजबळ यांच्याबाबत केलेल्या दाव्यामुळे राजकारणात खळबळ उडाली. छगन भुजबळ हे भाजपाच्या वाटेवर असल्याची पोस्ट। पान २ वर

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर जिल्हा दौरा

सोलापूर/प्रतिनिधीः उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार हे शनिवार दिनांक ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील.



शनिवार, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता रे- नगर, कुंभारे, ता. दक्षिण सोलापूर येथे आगमन. ९.४५ वा. ग्रामदैवत सिध्दरामेश्र्वर मंदिर- दर्शन. सकाळी १०.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे आगमन व जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठकीस उपस्थिती. नंतर पत्रकार परिषद. दुपारी १२.४५ वा. रामवाडी सोलापूर येथे आगमन व महिला सर्वरोग निदान आरोग्य शिबीर व विविध विकास कामांचा शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.३० ते २.१५ राखीव. २.३० वा. एम्पलायमेंट चौक, सोलापूर येथील जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय उद्धाटन समारंभ उपस्थिती. ३.०० वा. जुनी मिल कंपाऊंड चौक, सोलापूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय उद्धाटन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. ४.३० वा. जामगुंडे मंगल कार्यालय, आसरा चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६.०० वा. हॉटेल बालाजी सरोवर येथे अल्पसंख्यांक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने ट्रस्टी संवाद कॉन्फरन्स उपस्थिती. सायंकाळी ७.०० वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसाठी राखीव. ८.१० वा.मिलींद नगर, बुधवारपेठ येथे राखीव. ८.४५ वा. तिर्हे, ता. उत्तर सोलापूर येथे आगमन व राखीव. नंतर मोटारीने प्रयाण.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय; मनोज जरांगे यांना आता सरकारी सुरक्षा, पोलीस तैनात



मुंबई : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्याबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी आता पोलीस तैनात असणार आहे. जरांगे यांना सरकारी सुरक्षा प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आजपासून जरांगे यांच्या सुरक्षेसाठी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. राज्य गुप्त वार्ता विभागाच्या आदेशाने मनोज जरांगे यांना पोलीस सुरक्षा पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मनोज जरांगे यांच्या सुरक्षेसाठी २४ तास दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. दरम्यान, त्याआधी सकल मराठा समाजाकडून मुख्यमंत्र्यांकडे मनोज जरांगे यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आजपासून दोन कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी नेमण्यात आले आहेत.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात २९ ऑगस्ट रोजी आमरण उपोषण सुरु केले होते. या उपोषणस्थळी पोलिसांची लाठीचार्ज झाला आणि त्याचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटू लागले. त्यानंतर मनोज जरांगे यांचे आंदोलन संपूर्ण राज्यभरात पोहचले. जोपर्यंत मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, अशी भूमिका मनोज जरांगे यांनी घेतली होती. जरांगे यांच्या आंदोलनाने राज्यातील मराठा आरक्षण आंदोलनाचा वणवा पुन्हा एकदा पेटला. मराठा समाजाने आरक्षणासाठी मुंबईवर मोर्चा काढला.

या मुंबई मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर नवी मुंबईत आल्यानंतर राज्य सरकारने जरांगे यांना सरकारने आश्र्वासन दिल्यानंतर मोर्चा स्थगित करण्यात आला.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यास काही ओबीसी संघटनांनी विरोध केला आहे. ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे, त्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्यास विरोध नाही. मात्र, ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र नाही, अशांना कुणबी प्रमाणपत्र आरक्षण देण्यास ओबीसी संघटनांनी विरोध केला आहे. राज्यसरकारने काढलेल्या सगेसोयरे । पान २ वर

# संपादकीय

## राजकारणाचा रंग...

जनता दल युनायटेड या पक्षाचे प्रमुख नेते नितीशकुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची आणखी एकदा शपथ घेतली आणि बिहारी राजकारणाचा एक वेगळाच रंग समोर आला. राजकारणामध्ये जेव्हा एखाद्या राज्याचा मुख्यमंत्री बदलतो तेव्हा त्याचे नावही बदलते; पण बिहारमध्ये मात्र मुख्यमंत्री तोच राहतो फक्त त्याचे मित्रपक्ष बदलत राहतात. हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. हे सिद्ध करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका नितीशकुमार यांनीच बजावली आहे. कधी केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपसोबत मैत्री करायची आणि कधी लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत मैत्री करायची आणि मुख्यमंत्रिपदावर कायम राहायचे हा राजकारणाचा डाव कित्येक वर्षे नितीशकुमार खेळत आहेत. पुन्हा एकदा त्यांनी तोच डाव खेळला आहे. साहजिकच बिहारच्या राजकीय इतिहासात बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नवव्यांदा शपथ घेतली, अशी नोंद नितीशकुमार यांच्या नावावर जरी झाली असली तरी अनेक वेळा त्यांनी पाच वर्षांच्या कालावधीमध्ये नवीन मित्रांसोबत शपथ घेतली आहे. ज्या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप आघाडीला आव्हान निर्माण करण्यासाठी 'इंडिया' आघाडीचा प्रयोग समोर येत होता आणि त्यासाठी नितीशकुमार हेच पुढाकार घेत होते. ते पाहता आता तेच नितीशकुमार हेच एनडीएचा घटक पक्ष झाल्याने इंडिया आघाडीला धक्का बसला आहे जेव्हा आगामी लोकसभा निवडणूक होईल तेव्हा बिहारमधील यश भाजपसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. देशातील लोकसभा निवडणुकीच्या जागांच्या संदर्भात तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य असलेल्या बिहारमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी नितीशकुमार यांची मैत्री भाजपलाही हवी असल्याने त्यांनी पूर्वीचे सर्वकाही विसरून नितीशकुमार यांना मैत्रीचा हात दिला. जसा 'आयाराम आणि गयाराम' हा वाक्प्रचार गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय झाला आहे त्याच धर्तीवर आता नितीशकुमार यांना समोर ठेवून पलटूराम हा वाक्प्रचारही लोकप्रिय होऊ लागला आहे. बिहारमध्ये सत्तेत सहभागी झालेल्या भाजपलासुद्धा नितीशकुमार यांची ही पलटूराम प्रतिमा लक्षात ठेवावी लागणार आहे. कारण यापूर्वी किमान दोन वेळा नितीशकुमार यांनी भाजपची साथ सोडली होती. ते पुन्हा तसे करणार नाहीत त्याची कोणतीही खात्री देता येत नाही. पण सध्या तरी भाजपसाठी लोकसभा निवडणूक महत्त्वाची असल्याने ही निवडणूक होईपर्यंत नितीशकुमार यांच्याबरोबरची मैत्री भाजप इमाने इतबारे निभावेल. त्यानंतर पुन्हा एकदा राजकारणाचा वेगळा रंग दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पान १ वरुन

## साने गुरुजींच्या स्मारकास निधी..

स्वीकार केला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृतीचे जतन होत असते, असेही त्यांनी सांगितले.

मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, अशी भावना सगळ्या मराठी जनतेची आहे. तिला ज्ञानभाषा करण्याची जबाबदारी जशी शासनाची आहे तसी आपल्या सर्वांची आहे. इंग्रजी, हिंदी आणि मराठी हा भाषाभ्यासाचा क्रम बदलून मराठी, हिंदी आणि इंग्रजी असा असावा. गाव खेड्यातील गरिबांच्या मुलांना आपल्या मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा त्यांचा मुलभूत अधिकार असल्याचे मत ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र शोभणे यांनी आज येथे व्यक्त केले.

संमेलनाध्यक्ष श्री.शोभणे यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषा, लेखक, धर्म, संस्कृती, परंपरा व आजच्या तरूणाईचे प्रश्न याविषयी मत मांडले. ते म्हणाले की, मराठी साहित्य व भाषा टिकविण्यासाठी प्रयत्न करण्याची शासनाबरोबर वेगवेगळ्या समाजघटक, संस्थांची जबाबदारी आहे. प्रसार माध्यमांनी ही मराठी भाषा व व्यवहाराला अग्रक्रम देण्याची गरज आहे. अभिरूची वाढविणारे दर्जेदार कार्यक्रम सादर करण्याची जबाबदारी दृकश्राव्य वाहिन्यांवरील निर्मात्यांची आहे. तसे वृत्तपत्रांतून दर्जदार मजकूर देण्याचं काम संपादकांचे आहे. असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

मराठी साहित्य जगताचा विचार करताना नव्या पिढीकडून आशा पल्लवित होत आहेत. आपल्या अनुभवांना वेगवेगळ्या आकृतिबंधात मांडत आपला शोध घेणारी म्हणून नवी पिढी आज काही लक्षवेधी लेखन करीत आहे. भारतीय लोकशाहीतील आधारस्तंभ असलेल्या संसद व राज्य विधानमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात साहित्य, कलावंतांची त्यांच्या राखीव जागेवर वेळोवेळी निवड होणे गरजेचे आहे. अशी अपेक्षाही साहित्य संमेलनाध्यक्ष श्री. शोभणे यांनी व्यक्त केली.

शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणाले की, मराठी भाषा वेगवेगळ्या राज्यात पोहचविण्याचे काम बृहन्महाराष्ट्र मंडळांने केले आहे. तालुकास्तरावर साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी २ लाख रूपये निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या वर्षापासून शाळेत वाचनाचा तास सक्तीचा केला आहे. साहित्य पारितोषिकात शासनाचा हस्तक्षेप नसावा, ही शासनाची भूमिका आहे. साहित्याची चळवळ रूजविण्याचे काम शासनाची चार मंडळ करत आहेत. मराठी धोरण यावर्षी जाहीर करणार आहोत. लवकरच मराठी भाषा धोरण जाहीर करणार आहोत. संत साहित्य संमेलनास दरवर्षी २५ लाख देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सहा विभागात पुस्तकाचे गाव केले जाणार आहे. मुंबईमध्ये शासनाच्यावतीने मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे. वाई गावात मराठी विश्र्वकोश मंडळाची भव्य इमारत बांधण्यात येणार आहे. मराठी युवक मंडळांना पाच हजारांचे अनुदान दिले जाईल. मराठी भाषेच्या विकासासाठी साहित्यिकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही श्री.केसरकर यांनी यावेळी दिली.

संमेलनाच्या उद्घाटक सुमित्रा महाजन म्हणाल्या की, काळ्या मातीला हिरवा शालू नेसवून आपल्या कवितेच्या माध्यमातून सेवा केलेले कवी ना.धो.महानोर, जीवनाचे मर्म आपल्या अहिराणी रचनेच्या माध्यमातून मांडणाऱ्या बहिणाबाई चौधरी यासारख्यांनी खान्देशचे साहित्य समृद्ध केले आहे. राजकारणातील लोकांना साहित्याचा गंध नसतो असे म्हणता येणार नाही. साहित्यातून समाजात वागावे कसे याची शिकवणूक मिळते. तळागाळातील लोकांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजकारण, समाजकारण केले जाते. उत्तम साहित्यातून समाजसेवेचे मूल्य मिळतात. तुमचं मन शुध्द असेल तर तुम्ही जीवनात अयशस्वी होऊ शकत नाहीत. पुस्तके जगाला जवळ आणण्याचे काम करतात.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, ७२ वर्षांनी जळगाव जिल्ह्यास साहित्य संमेलन आयोजनाचा मान मिळाला आहे, ही सर्व जळगाव वासियांसाठी अभिमानाची बाब आहे. जळगाव जिल्ह्याबरोबरच अमळनेर तालुक्याला साहित्याची परंपरा आहे. पुज्य साने गुरूजीच्या नगरीत होत असलेले भव्यदिव्य होण्यासाठी संमेलनास येणाऱ्या सर्वांना आवश्यक सोईसुविधा पुरविण्यात येत असून त्यासाठी सर्व यंत्रणा रात्रंदिवस झटत आहेत. साहित्यप्रेमींनी संमेलनास उपस्थित राहून आनंद घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

संमेलनाचे निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील म्हणाले की, अमळनेर तालुक्याला संत सखाराम महाराजांचे आशीर्वाद लाभले आहेत. साने गूरूजींची कर्मभूमी आहे. शिक्षणाचे पंढरपूर म्हणून अमळनेराचा लौकिक आहे. अमळनेरसारख्या साहित्य नगरीत संमेलन होत आहे ही अभिमानाची बाब आहे. संमेलनाच्या निमित्ताने अमळनेर शहराची शोभा वाढली आहे. साहित्यिकांच्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या बळकटीकरणासाठी झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. श्रीमती उषा तांबे म्हणाल्या की, जीवनाची मूल्य साने गुरुजींनी रूजवलेली आहेत. खान्देश साहित्यिक व रत्नांची खाण आहे. साहित्य संस्थांचे मराठी साहित्य व्यवहारात योगदान आहे. यावेळी प्रताप महाविद्यालयाचे मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा.रमेश माने यांनी संपादित केलेल्या 'खान्देश वैभव' स्मरणिकेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक चळवळीत झोकून देऊन काम करणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व: लिंबाजी सुरवसे

सराटी ता. तुळजापूर येथील शेतकरी बौद्ध कुटुंबात जन्मलेले लिंबाजी सुरवसे हे महाविद्यालयीन विद्यार्थी दशेपासूनच एक आक्रमक कार्यकर्ता म्हणून पुढे आलेले आहेत .सुरुवातीच्या काळात ते दलित पँथरचे कार्यकर्ते म्हणून काम केले .पुढे डी एड चे शिक्षण झाल्यानंतर जवाहर विद्यालय अणदूर येथे शिक्षण महर्षी माजी आमदार,सि.ना.आलुरे गुरुजी यांच्या जवाहर विद्यालय मध्ये त्यांना शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली ते दलित पँथरचे कार्यकर्ते असल्यामुळे अन्याय अत्याचाराचे विरोधात सतत चीड असणारे आणि अन्याय त्याच्याविरोधात बंड करणारे लिंबाजी सुरवसे गुरुजी हे शिक्षक असले तरी जिथे कुठे अन्याय होईल तिथे त्याला प्रखर विरोध करत असत .मग तो समाज कारण , राजकारण , गावात असो बाहेर असो कुठेही अन्याय अत्याचाराच्या घटना घडल्या तर त्याला विरोध करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना सुद्धा अनेक वेळा वैचारिक संघर्ष अनेक लोकांबरोबर त्यांनी केलेला आहे. पण ते सत्याची बाजू घेऊन ते सातत्याने लढत राहिले आहेत. फुले, शाहू ,आंबेडकर यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्यावर असल्यामुळे अन्याय ,अत्याचाराचे विरोधात लढण्याची धमक त्यांच्या कायम राहिली .पुढे बामसेफ सारख्या संघटनेमध्ये मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे ही संघटन केले आहे. त्यांनी अनेक कर्मचाऱ्यांना जोडण्याचा प्रयत्न केला .प्रत्येकांच्या पर्यंत फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार रुजवण्याचे काम त्यांनी केलेले आहे. तेहतीस वर्षे पाच महिने सेवा करून ते ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यामुळे त्यांच्या कार्याचा आढावा घेत असताना नोकरीमध्ये जितकी वर्षी केली त्याच्या आधीचे पंधरा ते वीस वर्षे हे सामाजिक लढ्यामध्ये चळवळीमध्ये काम केले आहे. सराटी गाव आणि तेथील बौद्ध समाज म्हणजे या परिसराला एक वैचारीक व अत्यंत आक्रमक आणि पँथरच्या मुशीत वाढलेले हे गाव आहे त्यामुळे चळवळीचे केंद्र म्हणून ह्या गावाकडे पाहिलं जातं. रामदासजी आठवले साहेबांचे कार्यकर्ते त्या गावात सुरुवातीपासून असल्यामुळे, श्रीमंत कोरे, लक्ष्मण कोरे, के . डी.कांबळे साहेब, एस के.(कांबळे) चेले,डॉ. सुरेश कोरे अशा अनेक लोकांनी त्यासाठी योगदान दिलेले आहे आणि लिंबाजी सुरवसे सर हे फार वैचारिक दृष्ट्या त्यांच्या गावात एक प्रभाव निर्माण केलेला आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूरच्या वतीने त्यांच्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बरोबर काम करण्याचा योग त्यांना मिळाला आणि लिंबाजी सुरवसे गुरुजी म्हणजे त्या काळात सराटीचे अण्णा हजारे असेच मी त्यांना म्हणत होतो. त्यावेळी लोक त्यांच्या शब्दाला किंमत देत होते आणि पूर्ण गाव त्यांच्याकडे आजही काही समस्या गावात निर्माण झाली तर सुरवसे गुरुजींना भेटायला येतात .म्हणजे प्रभाव त्यांनी निर्माण केला आणि म्हणून अनेक लोकांना त्यांच्या विचाराचा त्यांच्या कामाचा फायदा झालेला आहे. लोक त्यांच्या शब्दाच्या पुढे जात नाहीत व त्यांनी निष्पक्ष केलेली सेवा ही खरंच उल्लेखनीय आहे. बचत गटाची चळवळ त्यांनी गावात रुजवली. त्यांनी एक सामाजिक संस्था ही सुरू केलेली आहे . अर्थकारण समाजकारण या सगळ्या कामांमध्ये त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे काम केले आहे. चिवरी पशु हत्याविरोधी आंदोलनात अधोरे गुरुजींच्या सोबत ते सक्रिय होते ९१ मध्ये यात्रेला शंभर टक्के शालेय पशुहत्या बंद झाली पण यात्रेनंतर जो आकार झाला सर्व शिक्षकांवरती गुरुजींवरती चिवरीतील काही समाजकंटकांनी हल्ला चढविला त्यात लिंबाजी सुरवसे पण गंभीर जखमी झाले होते अनेक दिवस दवाखान्यात ऍडमिट होते दाभोळकरांनी सुद्धा या लढ्यातील सहभागी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे तेव्हा पत्र पाठवलेले होते यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सक्रिय काम यांनी केले आहे. साने गुरुजी कथामाला त्याचे राष्ट्रीय अधिवेशन २०२३ मध्ये अणदूर येथे घेतले त्याचे संयोजन सुरवसे गुरुजी यांनी केले होते . महात्मा गांधी यांनी लिहिलेल्या हिंदू स्वराज या पुस्तकाला शंभर वर्षे पूर्ण झाली .त्यानिमित्त सि . ना . आलूरे गुरुजी यांनी मोठा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमाची जबाबदारी सुरवसे गुरुजी यांच्यावरती होती. त्यांनी लोकशिक्षण व सामाजिक संस्था ही सुरु केली आहे.त्या संस्थेच्या माध्यमातुन सराटी व परिसरातील गावात जनजागृती केली आहे. अनेक गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतनिमित्त अनेक गावांत जाऊन प्रबोधन करण्याचे काम केले आहे.टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील डॉ.रमेश जारे ,राम राठोड यांच्या सोबत त्यांनी पाणलोट क्षेत्र विकासाचे काम करीत होते त्याच बरोबर २००५ चा जो नरेगा चा नवीन कायदा झाला त्या कायद्याच्या बाबत जनजागृती करण्याचे काम त्यांनी केले आहे . लिंबाजी सुरवसे गुरुजींच्या कामाची तर मला एक छाप दिसू लागली की अनेकांनी सांगितले की आम्हाला मार्गदर्शन गुरुजींनी केलं त्यामुळे आम्ही हे करू शकलो . समाजासाठी अहोरात्र काम करणारे लिंबाजी सुरवसे सर यांना सेवानिवृत्ती निमित्त शुभेच्छा देतो व भावी आयुष्य निरोगी लाभो त्यांनी घेतलेला समाज कार्याचा वसा असाच पुढे चालत राहो ही अपेक्षा इतकेच

**मारुती बनसोडे**
**परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग**
**९५९५१७१८६६**

नितीश कुमार यांनी भाजपसोबत पहिल्यांदा आघाडी तोडताना एका मर्यादेपर्यंत टीका केली. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने भाजपवर टीका करताना ती मर्यादा ओलांडली असल्याचे विनोद तावडे यांनी म्हटले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यकाळातही मी काम केले आहे. मात्र, मागील काही वर्षात उद्धव यांच्या काळात टोकाची टीका करण्यात आली. उद्धव ठाकरे यांना काही काळापूर्वी लोकांची सहानुभूती होती. मात्र, त्यांना ती आपल्या मतांमध्ये वळवण्यात अपयश आले आहे. त्यामुळे उद्धव यांनी ती संधी गमावली असून आमच्याकडे मतदार वळले असल्याचे आमचे विश्र्लेषण असल्याचे विनोद तावडे यांनी म्हटले.

## आमच्यात फार मतभेद, प्रकाश

वातावरण बदलण्यासाटी आम्ही एकत्र राहणं गरजेचं आहे. प्रकाश आंबेडकर यांनी आजच्या बैठकीत त्यांच्या अनेक भूमिका मांडल्या. त्यावर सविस्तर चर्चा करून लवकरच आम्ही पुन्हा भेटणार आहोत. आमची जागावाटपावर चर्चा चालू आहे. आमच्यासाठी जागावाटप हा काही मोठा प्रश्न नाही. भाजपाचा पराभव करणे ही आमची प्राथमिकता आहे. त्यानंतर जागावाटप होईल. आमच्यात सकारात्मक चर्चा चालू आहे. काँग्रेस, राष्ट्रवदी काँग्रेस, शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी हे चारही पक्ष एकत्र आहेत. आमच्यात फार मतभेद नाहीत.

संजय राऊत म्हणाले, महाविकास आघाडीचा एक कॉमन मिनिमम प्रोग्राम ठरवणार आहोत. त्यासाठी वेगळं पथक तयार कलं जाईल. त्यासंदर्भात प्रकाश आंबेडकरांच्या काही सूचना आहेत, काही सामाजिक बाबी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या काही गोष्टींचा त्यात समावेश व्हायला हवा, असं त्यांचं म्हणणं आहे. आम्ही त्याकडे गांभीर्याने पाहत आहोत.

## अंजली दमानिया सुप्रिया सुळेंच्या..

अंजली दमानिया यांनी टाकली होती. त्यावर आता भाजपाचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आमच्या पक्षाचे निर्णय आम्हीच घेत असतो, अंजली दमानिया आमचे निर्णय घेत नाहीत. अंजली दमानिया अलीकडच्या काळात सुप्रिया सुळेंच्या अधिक संपर्कात आहेत, त्यामुळे त्या अशा पोस्ट टाकत असतील. पण छगन भुजबळ त्यांच्या पक्षात आहेत, आम्ही आमच्या पक्षात आहोत, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली. अंजली दमानिया यांना एवढंच सांगेन की, छगन भुजबळ भाजपाच्या संपर्कात नाहीत. त्यांनी स्वतः भाजपामध्ये येण्याची कधी इच्छा व्यक्त केलेली नाही आणि ते कधी भाजपामध्ये येणारही नाहीत. चुकीच्या बातमी पसरवणे योग्य नाही, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.भुजबळ भाजपाच्या वाटेवर?, एकेकाळी भुजबळांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध जनहित याचिका करणारा भाजपा त्यांना मोठा ओबीसी नेता बनवणार? अशा भ्रष्ट माणसांना मोठं करणार, राजकारणासाठी? कुठे फेडाल हे पाप? असा प्रश्र्न अंजली दमानिया यांनी एक्स (ट्विटर) वरील पोस्टमधून उपस्थित केला आहे.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय;

अध्यादेशाला चंद्रपूर जिल्ह्यातील काँग्रेस आमदार प्रतिभा धानोरकर यांनी कडाडून विरोध केलाय. विशेष म्हणजे या अध्यादेशाविरुध्द ७ तारखेला चंद्रपुरात ओबीसी, एसबीसी आणि व्हीजे-एनटी यांचा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात आमदार धानोरकर यांचा देखील सक्रीय सहभाग असणार आहे. आमदार प्रतिभा धानोरकर यांनी या अध्यादेशाविरुध्द ओबीसी एकवटतील असा इशारा दिला.

## अब की बार भाजप तडीपार...

देणारी पहिला व्यक्ती उध्दव ठाकरे आणि पक्ष शिवसेनाच होता. तरी पण लोकसभा निवडणूक झाल्यावर भाजपने आमच्याशी युती तोडली. आता आमचा पक्षच संपवायला घेतला. आज मुस्लिम समाज आमच्या सोबत आला आहे. कारण त्यांना आमचे हिंदूत्व मान्य आहे. त्यामुळेही काहींना पोटशूळ उठला आहे. आम्ही काँग्रेस सोबत गेलो म्हणून हिंदूत्व सोडल्याचा आरोप केला जातो. पण पंचवीस वर्ष तुमच्या सोबत राहून आमच्या पक्षाचा भाजप झाला नाही तर काँग्रेस कसा होणार असा प्रश्न त्यांनी विचारला.आज आपण जागे झालो नाही तर उद्या असे झोपू की पुन्हा उठता येणार नाही, हुकूमशाहीचा वरवंटा आपल्या डोक्यावर कधी फिरेल कळणार नाही. त्यामुळे जागे व्हा, मी आणि फक्त मीच ही वृत्ती ठेचायती आहे. त्यासाठी तयारीला लागण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी भास्कर जाधव, अनंत गीते यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

## तेजस्वीला मुख्यमंत्री नको

नाही. आप आणि काँग्रेसचे आरोप बिनबुडाचे असल्याचे तावडे यांनी म्हटले. पंजाब, चंदीगडमध्ये आप आणि काँग्रेसमध्ये धुसफूस आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी चंदीगड लोकसभेच्या जागेवर दावा केला होता. ही बाब काँग्रेस नगरसेवकांना खटकली. काँग्रेसची मते मोठ्या प्रमाणावर आपकडे वळली आहेत. त्यामुळे काँग्रेस नगरसेवकांमध्ये मान यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नाराजी होती, असेही तावडे यांनी म्हटले.

# धोत्री येथे माजी विद्यार्थी यांचा स्नेहमेळावा

दर्शनाळ/देविदास माने :दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे १९९९,२००० इयत्ता

दहावी बॅच विद्यार्थी विद्यार्थिनी आणि शिक्षक यांनी एकत्र येऊन पंचवीस वर्षानंतर एकमेकांच्या गाठीभेटी बोलणे चालणे संभाषण एकमेकाचे विचार आचार प्रचार एकत्र कुटुंब या सर्व गोष्टी विचारात घेऊन स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात साजरा यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नंदकुमार धाये सर , कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री स्वामीनाथ कलशेट्टी सर शिक्षक वृद्ध श्री. शिवशरण बिरादार सर, श्री ढमढेरे सर, पाटील सर , सौ ललिता मठपती मॅडम, श्री व्हनकडे सर, श्री, कौलगी सर, विद्यार्थी या स्नेह मेळावा आयोजन करण्यासाठी प्राध्यापक श्री सोमनाथ स्वामी, विजय स्वामी, पैगंबर पठाण, केदार बिराजदार, सज्जन पाटील, प्रकाश रामपूरे, चंद्रकांत जमादार, मल्लिनाथ पाटील , राजेंद्र बिराजदार, गुरुसिद्धप्पा बिराजदार, अनिल सगरे सर, रेणुक चौगुले सर, सोमनाथ मठपती, सौ रेणुका प्रथमशेट्टी , सौ नंदिनी स्वामी, सौ कन्याकुमारी बिराजदार, या सर्व विद्यार्थ्यांचे स्नेह मेळावा साठी हातभार लाभले. सूत्रसंचालन प्राध्यापक सोमनाथ स्वामी सर यांनी तर आभारप्रदर्शन रेणू चौगुले सर यांनी केले.

# पाणीटंचाईमुळे उल्हासनगर महानगरपालिका वर महिलांचा मोर्चा

उल्हासनगर : बाळासाहेब अहिरे उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत चोपडा परिसर मध्ये पाणीटंचाई असल्यामुळे नागरिक हैराण झाले असून महानगरपालिका यांना पत्र व्यवहार स्थानिक समाजसेवक यांनी करूनही अधिकारी कुठल्या प्रकारे या पाणी टंचाई विरोधात कारवाई करत नसल्यामुळे स्थानिक महिला यांनी महानगरपालिकेवरती धडक मोर्चा काढण्यात आला यावेळी महानगरपालिका आयुक्त अजीज शेख यांनी आपल्या परिसर मध्ये दररोज एक तास पाणी उपलब्ध होईल असे आश्र्वासन दिल्यामुळे महिलांनी माघार घेतली जर यापुढे स्थानिक रहिवासींना पाणी न मिळाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडू असे समाजसेवक नाना बागुल साहेब यांनी आयुक्तांना इशारा देण्यात आला



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कौशल्य विकास विभागाने प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना रोजगार मिळण्यासाठी प्रयत्न करावेत :जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधीः प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात किमान कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना स्वयंरोजगार अथवा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास विभाग तसेच संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेने ही प्रयत्न करणे गरजेचे आहे. या अंतर्गत प्रशिक्षण घेतलेला एकही उमेदवार रोजगारापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी काळजी घ्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी कौशल्य विभागाचे सहाय्यक आयुक्त हनुमंत नलावडे, जिल्हा समन्वयक कृष्णा यादव, जिल्हा



नियोजन अधिकारी दिलीप पवार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. बी.काटकर यांच्यासह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की प्रमोद महाजन कौशल्य उद्योजकता विकास अभियानांतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम सन २०२३-२४ बॅच वाटप करत असताना कौशल्य विकास विभागाने जिल्ह्यातील कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या सर्व अधिकृत संस्था शासनाने विहित केलेल्या नियमाप्रमाणे प्रशिक्षण उमेदवारांना देत आहेत का यावर नियंत्रण ठेवावे. वेळोवेळी याचा आढावा घेत राहावा. कोणत्याही प्रकारे शासन नियमाप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण होत असल्याची खात्री करावी. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित उमेदवारांना रोजगार अथवा स्वरोजगार उपलब्ध करण्याबाबत ही प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सारथी अंतर्गत विकास कार्यक्रम सुरू करणे रे नगर येथे कौशल विकास केंद्र सुरू करणे समितीमध्ये नवीन निमंत्रित सदस्याचा समावेश करणे आदि बाबींचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

प्रारंभी कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे व सहाय्यक संचालक हनुमंत नलावडे यांनी प्रमोद महाजन कौशल्य उद्योजकता विकास अभियान अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या किमान कौशल्य विकास कार्यक्रमाविषयी माहिती दिली. यावर्षी जिल्ह्यातील सर्व अधिकृत कौशल्य विकास केंद्रांना ५०० उमेदवारांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या माध्यमातून कौशल किमान कौशल्य विकास कार्यक्रम सन २०२२- २३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्राचे वाटप प्रातिनिधिक स्वरूपात १० उमेदवारांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# नागनाथ सुतार 'डिजिटल स्टार महागौरव' पुरस्काराने सन्मानित

पंढरपूर/प्रतिनिधी : पुरस्कार म्हणजे कामाची पोचपावती आणि पाठीवर मिळणारी शाबासकीची थाप. असाच एक मानाचा पुरस्कार नागनाथ सुतार यांना प्रदान करण्यात आला. डिजिटल मीडिया संपादक



पत्रकार संघटना महाराष्ट्र यांच्या वतीने डिजिटल महास्टार २०२४ हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. सोमवार दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी कोल्हापुरातील कणेरी मठ येथे आयोजित सोहळ्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. यावेळी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजा माने, चित्रपट अभिनेते गिरीश कुलकर्णी, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत , राज्य संघटक सुनील उंबरे सोलापूर जिल्हाध्यक्ष प्रवीण नागणे,पंढरपूर शहर अध्यक्ष सचिन कुलकर्णी, तालुका अध्यक्ष तानाजी जाधव यांच्यासह राज्यभरातून आलेले मीडिया क्षेत्रातील हजारो सदस्य उपस्थित होते.

एचपीएन यूट्यूब चॅनलच्या माध्यमातून उच्च तंत्रकौशल्याला बातमी मूल्याची जोड देणारा ग्रामीण महाराष्ट्रातील डिजीटल स्टार म्हणून नावारूपास येत आहे. तसेच पश्र्चिम महाराष्ट्रात अनेक युट्युब चॅनल्सचे जाळे विणण्याचे महत्त्वपूर्ण कार्याची नोंद घेवून डिजिटल मीडिया संपादक - पत्रकार संघटनेच्यावतीने डिजीटल स्टार महागौरव २०२४ राज्यस्तरीय पुरस्कार हा संपादक नागनाथ सुतार यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

# बसवण्णा हे कर्नाटकचे सांस्कृतिक नेते, सोलापुरात जागतिक लिंगायत महासभेचा जल्लोष

शिरवळ/हणमंत घोदेः जागतिक लिंगायत महासभा सोलापूर जिल्हा युनिटच्या वतीने कर्नाटक सरकारने नुकतीच

जगज्योती, ज्ञानभंडारी विश्र्वगुरु बसवण्णा यांना राज्याचे सांस्कृतिक नेते म्हणून घोषित केल्याच्या पार्श्र्वभूमीवर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. येथील एमके फाउंडेशनच्या कार्यालयात रविवारी जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव सर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली बैठकीत कर्नाटक सरकारच्या या कार्याचे कौतुक, अभिनंदन व आभार मानले.

महिला संघाच्या जिल्हाध्यक्षा राजश्री थळंगे म्हणाल्या की, महिलांनी आपल्या महिलांसोबत सादर केलेले 'अक्का-अल्लामारा संवाद' या अनुभव मंडपाताचे रूपक सादर करण्याची संधी मिळाल्याने महिलांना खूप आनंद झाला. महिलांच्या सभेला जाऊन

तिथला अनुभव घेतल्यानंतर ते म्हणाले,सोलापुरात असा कार्यक्रम होणार आहे

एकदिवसीय लिंगायत अभ्यास श, सोलापूर, शहर युनिट येथे घेण्यात यावे, अशी सूचना करून पुढील महिन्यात एक दिवसीय कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला.यावेळी उपाध्यक्ष राजेंद्र खासकी, महिला युनिटच्या अध्यक्षा राजश्री थळंगे, डी.सोलापूर तालुकाध्यक्ष जे. बसवराजा नांदरगी, मंगळुरू तालुकाध्यक्ष अमोला म्हामणे, खजिनदार नागेंद्र कोगनुरे, बसवराजा चकई, राजेंद्र होवडे, मीनाक्षी बागलकोटे, कविता हलकुडे, विजय भावे, शिवराय ठेली, मल्लिनाथ थलंगे, अशोक सेगावकर, डॉ.भीमानाथ सुरगाव, दुग्धनाथ सुरगावकर आदी उपस्थित होते.



# स्व.परशराम नागरे वाचनालय सारोळेथडीत वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार सोहळा संपन्न

## गोदावरी महाराष्ट्र गौरव पुरस्काराने बाबुलाल थोरात सन्मानित

निफाडः निफाड तालुक्यातील सारोळेथडी येथील स्व.परशराम पांडुरंग नागरे सार्वजनिक वाचनालयाच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित बाप समजुन घेताना या विषयावर हृदयस्पर्शी व्याख्यान सांगली येथील युवा समाजप्रबोधनकार वसंत हंकारे यांनी दिले .बाप आपल्या मुलांसाठी काय असतो? बाप आपल्या मुलांसाठी किती कष्ठ घेवून त्याचे सुख पाहत असतांना जर मुलामुलीने चुकीचा निर्णय घेतला तर बाप आयुष्यातून उद्धवस्थ होतो.याचे विवंचन करत असताना आपल्या भारदस्त आवाजात सर्वाना मंत्रमुग्ध केले.



यावेळी महिला व मुलीच्या मासिक पाळीविषयक आजारांविषयी बोलतांना महाराष्ट्राचे पँडमॅन विकास धनराज गोपाल यांनी परीपुर्ण माहिती देत आपण गर्भाशय काढण्यापासून वाचवू शकतो असेही ते म्हणाले.याबरोबर च महिलांनी स्वावलंबी होवून स्वतःचा उदयोग व्यवसाय करावा.याविषयी मार्गदर्शन केले. या वेळी गोदावरी महाराष्ट्र गौरव पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला.

वी आर मोअर च्या डायरेक्टर प्रिया चांदोरकर कड मॅडम यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निफाड येथील नगरपंचायत कर्मचारी बाबुलाल थोरात यांना उत्कृष्ठ आरोग्य सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

. मालेगाव येथील संदिप आव्हाड यांना आदर्श कलारत्न पुरस्काराने

तर उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य स्टार न्युज वृत्तवाहिणीच्या मुख्य कार्यकारी संपादिका अदिती पेढारी यांना आदर्श संपादक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . योगेश अडसरे ,प्रशांत गवळी , रत्ना ताई चांदगुडे यांनाही यावेळी गौरविण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रातुन उल्लेखनीय कार्य केलेले पुरस्कारार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभाष नथुजी नागरे तर प्रमुख अतिथी म्हणून स्टार न्युजचे संपादक विलास सुर्यवंशी डॉ.बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापिठाचे संघर्ष सावळे सर प्रसिद्ध चित्रकार अरविंद शेलार डॉ.आनंद आहिरे डॉ.विवेकानंद काशिद सर प्राचार्य कोळपे इन्सिट्युट ऑफ सायन्स कॉलेज कोळपेवाडी.मधुकर शेलार अध्यक्ष माणकेश्र्वर वाचनालय निफाड बाळासाहेब शिरसाठ .जि.प.सदस्य डॉ.विलास नाठे डॉ.रोहीत धोक्रट अशोक सदाशिव नागरे सरपंच बाळासाहेब बबनराव आव्हाड,विलास नागरे,विनायक पांडुरंग नागरे सुदाम नागरे ,सह पंचक्रोशीतील नागरीक व विद्यार्थी पालक बहुसंख्येन उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते पत्रकार मुकुंद बबनरावआव्हाड यांनी केले. यावेळी विशेष परीश्रम वाचनालयाचे संस्थापक माणिक नागरे यांनी घेतले.

# आईचे प्रेम देणारी मराठी भाषा, तीचे स्वत: रक्षण केले पाहिजे...!

## मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन : मुर्री निवासी शाळेत भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

गोदिंया : माणसाचा जन्म झाला की आपणाला भाषा बोलावी लागते, ती बोलीभाषा असते. मराठी भाषा ही मातृभाषा असून आपली राज्यभाषा सुद्धा आहे. तर या सर्व बाबींची जाणीव ठेवून आपण भाषेवर प्रेम करतो. त्याचप्रमाणे भाषेला उच्च स्थानावर पोहचवण्यासाठी मराठी भाषेचा आदर सन्मान केला पाहिजे. भाषा ही आईच्या ठिकाणी असते. आईचे प्रेम देणारी मराठी भाषा आहे तर मराठी भाषेचे स्वत: रक्षण करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे व मराठी भाषेचे अभ्यासक तथा कवी प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मार्गदर्शक मुन्नाभाई नंदागवळी, प्रमुख पाहुणे, अर्चना चव्हाण, दीक्षा तुरकर, दीक्षा डाहाके, शीला तांडी आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम हा दुपारी ०१.०० वाजता अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा मुर्री येथे साजरा करण्यात आला. शाळेतील मराठी भाषा मंडळ समिती यांनी आयोजित केले होते. राठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना भाषेविषयी सखोल व विस्तृत मार्गदर्शन करताना प्रा. नंदागवळी म्हणाले की भाषा जशी आईची महती सांगते, आई सारखी जपते तर आपण तीचे मुल समजून मातेचे रक्षण करावे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. भाषेवर भाष्य करत असताना व्याकरण, सुध्दलेखनाचे नियम, वाक्याची सुरुवात प्रमाणशीर शब्दांनी व्हायला हवे. जोड शब्द आणि मोठ्या स्वरूपाची शब्द रचना ही अवघड असतात तर ते दूर करण्यासाठी भाषेवर प्रभुत्व मिळविणे फारच गरजेचे असते.

भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे संचालन वर्ग नववीचा विद्यार्थी अनामिक दुर्योधन यांनी केले तर आभार दहावीचा विद्यार्थी अंश डोंगरे याने मानले. यशस्वीतेसाठी वर्ग नववी आणि दहावीच्या मराठी भाषा मंडळ शालेय समिती यांनी परिश्रम घेतले व साजरा करण्यात आला.

# स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

पंढरपूर/प्रतिनिधीः शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एमबीए व एमसीए प्रवेशाकरिता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सीईटी २०२४ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ मिळाली आहे. प्रशासनाकडून सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून नवीन वेळापत्रकानुसार एमबीए व एमसीए या दोन्ही कोर्सेस साठीच्या सीईटी- २०२४ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया मंगळवार, दि.०६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच एमबीए-सीईटी २०२४ व एमएएच एमसीए-सीईटी




२०२४ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीतील एमबीए व एमसीए या विभागात उपलब्ध करण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली. पदव्युत्तर पदवी असलेल्या एमबीएच्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजली जाणारी एमएएच-एमबीए-सीईटी २०२४ ही परीक्षा शासनाच्या दिलेल्या वेळापत्रकानुसार साधारण ९/ १० मार्च या दोन दिवशी होणार आहे. तर एमएएच-एमसीए-सीईटी २०२४ ही परीक्षा साधारण दि.१४ मार्च २०२४ च्या दरम्यान होणार आहे. एकूणच एमबीए व एमसीएच्या या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि.११ जानेवारी २०२४ पासून ते गुरुवार, दि.०१ फेब्रुवारी २०२४ पर्यंत चालणार होती परंतु विद्यार्थ्यांना संबंधित कागदपत्रे व प्रमाणपत्रे मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थी या एमबीए व एमसीएच्या -सीईटी पासून वंचित राहू नये यासाठी याला मुदतवाढ दिली आहे. आता एमबीए व एमसीए या दोन्ही पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशाकरिता मंगळवार, दि.०६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी शासनाच्या https://mbacet2023.mahacet.org या संकेत स्थळावर तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या एमबीएचे विभागप्रमुख प्रा.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व एमसीएचे विभागप्रमुख प्रा.मनसब शेख (९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# संपादिका रेणुका संतोष चव्हाण यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी

भिवंडीः भिवंडी शहरातून प्रकाशित होणारे बापाचा बाप या साप्ताहिकाच्या संपादिका व फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचा पुरोगामी विचार निर्भिडपणे आपल्या वृत्तपत्रात मांडणाऱ्या आणि खऱ्या अर्थानं 'बापाचा बाप'पणा जपणाऱ्या संपादिका व अधिस्वीकृती धारक पत्रकार रेणुका संतोष चव्हाण यांची मृत्यूशी झुंज अखेर दिनांक ३१ जानेवारी २०२४ रोजी अपयशी ठरली. त्यांच्या अकाळी व आकस्मित जाण्याने त्याच्या कुटंबीयांसोबत समाजामध्येही शोककळा पसरली.



एका यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे रेणूका चव्हाण आणि संतोष चव्हाण या उभयतांची जोडी. या राजा राणीच्या जोडीने आपला सुखी संसारच फुलवला नाही तर आपले सामाजिक दायित्वही प्रामाणिकपणे आपले कर्तव्य समजून रेणूका ताईने पार पाडले. स्त्री चे उद्धारक फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन महामावांचा विचारांचा वारसा प्रत्येक समाजापर्यंत पोहचावा यासाठी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून एक उपसिका ते केंद्रीय शिक्षिका म्हणुन काम करून आपले सामाजिक अनमोल योगदान देत पुरोगामी विचार आपल्या वृत्तपत्र बापाचा बाप मध्ये निर्भिडपणे अखंडित मांडले. शिक्षणाचे महत्व जाणून आपल्या दोन्ही मुलांना मेडिकलचे उच्च शिक्षण देऊन समाजालाही प्रेरित केले.

त्यांच्या पश्र्चात पती पालिका कामगार नेते संतोष चव्हाण ,मुलगा व मुलगी असा परिवार आहे. रेणुका चव्हाण या काही दिवसापासून आजारी असल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मावळली. बुधवारी सायंकाळी कामतघर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले. भिवंडीत त्याच्या राहत्या घरी अंत्ययात्रेला उपस्थित जनसमुदाय उत्तुंग कर्तुत्वाची साक्ष देत होती.यावेळी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी त्याचबरोबर विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा पुण्यानूमोदनाचा कार्यक्रम, आदरांजली सभा शुक्रवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री राज राजेश्र्वरी मंगल कार्यालय भारत कॉलनी, चंदनबाग, भिवंडी येथे सकाळी ठीक ११ .३० वाजता होणार आहे.

